**महाराष्ट्र शासन**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्र.बीयुडी-२०११/प्र.क्र.२४७/प्रशासन-१,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १५ जुलै, २०११

वाचा : (१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.मआख-१०.०७/प्र.क्र.६५/२००७/विनियम, दि.२२.०१.२००८

(२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०११/प्र.क्र.३/कोषा.प्र.५, दि.०५.०२.२०११

(३) बाष्पके संचालनालयाचे पत्र क्र.एसबी-४/लेखाशाखा/२०११/१४०२४, दि.२३.०६.२०११

**शासन निर्णय :**

बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकरिता रु.५००/- इतके स्थायी अग्रीम मंजूर आहे. तथापि, संदर्भाधीन क्र.(२) येथील शासन निर्णयानुसार रु.१०००/- पर्यंतची देयके अधिदोन व लेखा कार्यालयात / कोषागारात स्वीकारण्यात येत नसल्यामुळे बाष्पके कार्यालयास मार्च, २०११ पासून स्थायी अग्रीमाची देयके अधिदान व लेखा कार्यालयात सादर करता आलेली नाहीत. ही वस्तुस्थिती तसेच सध्याच्या महागाईच्या काळात वस्तूंचे वाढलेले भाव लक्षात घेता, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयासाठी स्थायी अग्रिमाची मर्यादा वाढवून रु.२,५००/- (रुपये दोन हजार पाचशे फक्त) इतके स्थायी अग्रीम मंजूर करण्यात येत आहे.

२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.मआख-१०.०७/प्र.क्र.६५/२००७/विनियम, दि.२२.०१.२००८ अन्वये महालेखापालांच्या सल्ल्याशिवाय विभागप्रमुखांच्या कार्यालयासाठी स्थायी अग्रीमाची रक्कम मंजूर करण्याच्या प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारात हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in ह्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०७१५१७४५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बा. शि. वानखेडे )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई

महालेखापाल (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई ३२.

कक्ष अधिकारी (कामगार-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

निवडनस्ती (प्रशासन-१)

C:\Vanita\BUD\247-L.doc